# इ. स. 400 ते 1600 या दरम्यान झालेला ख्रिस्ती धर्माचा प्रसार

मुलांना शिकवणाऱ्यांनी H4b2 हा अभ्यास वाचला पाहिजे.

1. ख्रिस्ती धर्माचा प्राचीन इतिहास तुमच्या लोकांना शिकवता यावा याकरीता प्रार्थना व वचनाच्याद्वारे तुम्ही स्वत:ची तयारी करा.

**प्रार्थना.** ''प्रभु येशू, तू लोकांना व राष्ट्रांना कशा प्रकारे आशीर्वादित केलेस हे आम्हांला इतिहासा तून शिकण्यास साहाय्य कर''

ख्रिस्ती धर्माने मूर्तीपूजेला विरोध केल्यावर काय घडले ते **प्रे. कृ. 19:11-28** मध्ये पाहा.

- येशूचे गौरव करण्यासाठी देवाने काय केले? *(पाहा वचने 11 व 12)*
- विश्वास न ठेवणाऱ्यांनी भूते काढण्यासाठी येशूचे नाव वापरले तेव्हा काय घडले? *(13-17)*
- जादूटोणा करणाऱ्यांशी विश्वासणाऱ्यांनी कसे वागावे? *(18-20)*
- मूर्तिपूजक पुजारी आणि धार्मिक लोक काय करायचा प्रयत्न करतील? *(21-28)*

## ख्रिस्ती धर्म इ. स. 400 पासून 800 पर्यंत

आशियातील लोक पश्चिमेकडे गेल्यावर मूर्तीपूजक लोकांनी रोमन साम्राज्यावर आक्रमण करून ते खिळखिळे केले. याचे ख्रिस्ती धर्मावर बरेच परिणाम झाले:

- मूर्तीपूजक लोकांनी सुवार्ता ऐकली आणि अनेकजणांनी विश्वास ठेवाला.
- मंडळया नाही तर मठ हेच विश्वसाचे आणि शिक्षणाचे केंद्र झाले
- आयर्लण्ड मधील केल्ट लोकांनी मठपद्धतीची सुरूवात केली तसेच संपूर्ण युरोपमध्ये सुवार्ता प्रसार केला.
- केल्ट लोकांनी साक्षरता प्रसार करून शिक्षण दिले, पवित्र शास्त्राचे व इतर पुस्तकांची भाषांतरे केली.
- दक्षिण आशियामध्ये मंडळयांची सुरूवात झाली.
- नेस्टोरिअन ख्रिस्ती लोकांनी मध्य आशियामध्ये मठातील शाळा सुरू केल्या
- नेस्टोरिअन ख्रिस्ती धर्माची इ. स. 845 पर्यन्त चीनमध्ये भरभराट झाली
- रोमन सम्राट चार्लमान ह्याने 8 व्या शातकात ख्रिस्ती धर्म आणि न्यायाला प्रोत्साहन दिले.

येशूने आपल्या शिष्यांना जगात कोणत्या गोष्टींना तोंड द्यावे लागेल असे सांगितले ते **मत्तय 24:6-14** मध्ये पाहा.

- राष्ट्राराष्ट्रां मध्ये काय घडेल? *(पाहा वचने 6 व 7)*
- राष्ट्रांमधील येशूच्या शिष्यांच्या बाबतीत काय घडेल? *(9)*
- ख्रिस्ती धर्माविषयी ऐकलेले बहुतेक लोक काय करतील? *(10)*
- पुष्कळसे लोक कशामुळे मागे फिरतील? *(11 व 12)*
- ह्या काळामध्ये येशूच्या बहुतेक सच्च्या अनुयायांना काय करावे लागेल? *(13)*
- सुवार्तेच्या बाबतीत काय घडेल? *(14)*

## ख्रिस्ती धर्म इ. स. 800 पासून 1200 पर्यन्त

उत्तरे कडील व्हार्याकंग लोकांनी युरोपमधील संपत्तीच्या केंद्रांवर आक्रमण करून मठ उध्वस्त केले. कालांतराने इरूमामचे आशिया व युरोपवर आक्रमण झाले. याचेही ख्रिस्ती धर्मावर बरेच परिणाम झाले:

- व्हायकिंग लोकांनी अनेक ख्रिस्ती लोकांना बंदिवान म्हणून नेले आणि त्यांच्या कडून सुवार्ता ऐकली.

- ख्रिस्ती धर्माचा पुन्हा युरोपभर प्रसार होण्यास सुरूवात झाली.
- किमान नामधारी का होईना अनेक राजे व लोकगट ख्रिस्ती झाले.
- ख्रिस्ती धर्माचा प्रसार युरोपपेक्ष्ना संपूर्ण आशियात अधिक वेगाने झाला.
- काही काळ इस्लाम धर्माने ख्रिस्ती धर्माबदल सहिष्णुवृत्ती दाखवली, पण आजच्या घडीपर्यन्त त्याने त्याला दडपण्याचाच कसून प्रयत्न केला आहे.

**सूचना.** नस्टोरिअन ख्रिस्ती लोक आशियातील बरेचशे लोक व राष्ट्र यांच्यासाठी प्रभावी कार्य करणारे मिशनरी ठरले, कारण त्यांनी पुढील गोष्टी केल्या:

- त्यांचे बहुतेक सेवक स्वत:चा खर्च स्वत: चालवणारे व्यावसायिक व व्यापारी होते.
- दृष्टांत मिळण्यासाठी ते देवावर अवलंबून राहात आणि विश्वास न ठेवणाऱ्यांची खात्री पटण्यासाठी अदभुत चमत्कार करीत.
- त्यांनी अनेक ठिकाणी शैक्षणिक व वैद्यकिय सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या
- त्यांनी धोफादायक ठिकाणी मठांची स्थापना केली.
- त्यांनी पाळक व मंडळीसाठी सतत चालू असणारे प्रशिक्षण व देखरेख ठेवण्याची सोय उपलब्ध करून दिली.

तथापि, कालांतराने त्यांचे बरेचसे कार्य पुढील गोष्टींमुळे नष्ट करण्यात आले

- त्यांनी स्थानिक भाषांमध्ये पवित्र शास्त्राचा अनुवाद केला नाही.
- त्यांनी स्थानिक लोकांना त्यांच्या त्यांच्या मंडळया चालवण्यास परवानगी नाकारली.
- त्यांनी स्थानिक ख्रिस्ती लोकांना त्यांच्या स्वत:च्या संस्कृती प्रमाणे उपासना करण्यास परवानगी नाकारली.
- अनेक परिवर्तन न झालेले मंडळीचे नामधारी सभासद फक्त संपत्ती व सत्ता यासठीच जगले.

## ख्रिस्ती धर्म इ. स. 1200 ते 1600 पर्यन्त

पवित्र शास्त्राचा अनुवाद केला जावा, ते सर्वसामान्य लोकांनी वाचून आज्ञापालनाचे आचरण करावे या गोष्टीला युरोप व आशियातील ख्रिस्ती पुढाऱ्यांनी परवानगी नाकारली. याचे ख्रिस्ती धर्मावर बरेच विपरित परिणाम झाले:

- राजे व पोप ह्यांनी आपली संपत्ती व सत्ता वाढवण्यासाठी राजकारण आणी धर्म ह्यांची सरमिसळ केली.
- 1095 आणि 1350 या दरम्यान युरोपीयन लोकांनी मुस्लिम, यहूदी आणि आशियातील ख्रिस्ती लोकांच्या विरोधात धर्मयुद्धाच्या मोहिमा चालवल्या, त्यांनी अनेकांची कत्तल केली आणि त्यांची भूमी ताब्यात घेतली.
- युद्धात पराभव झाल्यावर मध्य आशियातील बहुतेक भागातील लोकांनी इस्लाम धर्माचा स्वीकार केला.
- इ. स. 1368 पासुन मिंग राजघराण्याने चीनमधुन नस्टोरिअन ख्रिस्ती धर्म पूर्णत : नामशेष केला.
- मुस्लिम सम्राट तामरलेनने (1336-1405) आशियातील बहुतेक ख्रिस्ती धर्म नष्ट केला.
- फ्रान्सिस्कन व डोमिनिकन ख्रिस्ती लोकांनी शांततामय मार्गानी मुस्लिम लोकांमध्ये सेवा करण्याचा प्रयत्न केला.

**2. येणाऱ्या आठवडयातील कार्यक्रमां विषयी तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून योजना आखा.**

या अभ्यासाचा भाग 1 वाचा आणि ख्रिस्ती लोकांनी केल्या पाहिजेत अशा काही गोष्टी लक्षात घ्या. याच गोष्टी तुम्हांला आणि विश्वासणाऱ्यांना तुमच्या मंडळीत कशा करता येतील त्याची योजना आखा.

या अभ्यासाच्या द्वारे मंळीचा इतिहास किंवा त्यांच्या गरजेनुसार अन्य विषय तुम्ही नवशिक्या मेंढपाळांना शिकवता व प्रशिक्षण देता त्यांची भेट घ्या. च्न्र्च हा मेनू वापरा.

**3. योणाऱ्या उपासनासभेसाठी तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून योजना आखा.**

येशूची सुवार्ता प्रेषितांनी कशा प्रकारे सर्वत्र पसरवली त्यासंबंधीच्य शास्त्रभागांचे भाग 1 मध्ये उल्लेख आहेत, ते विश्वासणाऱ्यांना वाचायला सांगा,

ख्रिस्ती धर्माच्या इतिहासात (इ. स. 1200-1600) मधल्या 400 वर्षांच्या काळात विश्वासणाऱ्यांनी कशा प्रकारे सुवार्ता सांगितली ते **स्पष्ट करून सांगा,**


छळ त्रास किंवा नाकारल्या जाण्याच्या काळात देवाने विश्वासणाऱ्यांना त्याच्याशी विश्वासू राहण्यास कशा प्रकारे साहाय्य केले त्याची त्यांनी साक्ष द्यावी.

**मुलांना** त्यांनी तयारी केलेली नाटिका सादर करण्याची **संधी द्या.**

**प्रभुभोजनाचा विधी** साजरा करण्यासाठी प्रकटी 20:4 हे वचन वाचा आणि येशू रक्तसाक्षी झाला तसेच त्याच्यासाठी मरणारे सर्वजण त्याच्या बरोबर राज्य करतील हे स्पष्ट करून सांगा.

**एकत्रिक पाठ करा मत्तय 10:32**

दोघा-तिघांच्या **लहान गटांना** योजना आखुन, एकमेकांसाठी प्रार्थना करण्यास तसेच प्रोत्साहन देण्यास सांगा.




*युरोपवर स्वारी करणाऱ्या व्हायकिंग लोकांनी तेथील बहुतेक ख्रिस्ती धर्म नष्ट केला,*
*तथापि, कालांतराने अनेक व्हायकिंग लोकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला.*

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net